गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

वर्ष १ ले ● अंक २५४ वा ● रविवार ०४ फेब्रुवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-


| * Volume 1 | Issue 254 | Date : 04/02/2024 blow :Sunday Page 4 Price 4

## काँग्रेसचे माजी मंत्री आणि आमदार अजित पवारांच्या संपर्कात

मुंबई : माजी खासदार मिलिंद देवरा यांच्यापाठोपाठ मुंबईतील काँग्रेसचे काही नेते सत्ताधारी पक्षांच्या संपर्कात आहेत. माजी मंत्री आणि आमदार बाबा सिद्दीकी लोकसभा निवडणुकीआधी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत जातील अशी चर्चा आहे. काँग्रेसचे १५ आमदार कुंपणावर आहेत. पुढील महिनाभरात बऱ्याच घडामोडी पाहायला मिळतील, असा दावा महायुतीमधील पक्षांच्या संपर्कात असलेल्या काँग्रेसच्या नेत्याने नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर केला आहे. २०१४ च्या आधी वायव्य मुंबई लोकसभा मतदारसंघात पक्षाच्या विजयात मोलाची भूमिका बजावणारे बाबा सिद्दीकी यांचे पुत्र झीशान सध्या वांद्रे पूर्वेतून आमदार आहेत. तेदेखील वडिलांपाठोपाठ पक्षाला सोडचिठ्ठी देऊ शकतात. ३१ वर्षांचे झीशान पहिल्या टर्मचे आमदार आहेत. त्यांनी पक्षांतराची शक्यता नाकारली आहे. पण अजित पवार आपल्या कठीण काळात सोबत राहिल्याचे त्यांनी म्हटले आहे.

मुंबईतील आणखी दोन मुस्लीम नेते काँग्रेस सोडण्याच्या तयारीत असल्याचे वृत्त आहे. मुंबादेवीचे आमदार अमिन पटेल आणि मालाड पश्चिमचे आमदार अस्लम शेख काँग्रेसमधून बाहेर पडण्याची शक्यता आहे. मुंबईत काँग्रेसचे केवळ ४ आमदार आहेत. आमदार झीशान सिद्दीकी यांचे वडील बाबा सिद्दीकी यांची मध्यंतरी ईडीकडून चौकशी झाली. तर अस्लम शेखही ईडीच्या रडारवर आहेत. अमिन पटेल हे मिलिंद देवरांचे निकटवर्तीय मानले जातात. देवरांनी काँग्रेस सोडल्यानंतरही ते पक्षात कायम आहेत. पण या तीन आमदारांनी काँग्रेसची साथ सोडल्यास मुंबईत काँग्रेसचा केवळ एकमेव आमदार राहील. वर्षा गायकवाड विधानसभेत धारावीचे प्रतिनिधित्व करतात.

# लालकृष्ण आडवाणींना भारतरत्न पुरस्कार जाहीर



नवी दिल्ली : भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपपंतप्रधान लालकृष्ण आडवाणी यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान पुरस्कार भारतरत्न जाहीर करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या एक्स खात्यावरून ही माहिती दिली.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स पोस्टवर लिहिलंय की, मला हे सांगताना अत्यंत आनंद होत आहे की लालकृष्ण आडवाणी यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केलं जाणार आहे. मी त्यांच्याशी संवाद साधला असून या पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.आमच्या काळातील सर्वांत प्रतिष्ठित नेत्यांपैकी एक असलेल्या आडवाणी यांचं भारताच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान आहे. संघटनेच्या तळापासून त्यांनी कामाला सुरुवात केली आणि उपपंतप्रधान पदापर्यंत मजल मारत देशाची सेवा करण्याचे काम केले. केंद्रीय गृहमंत्री आणि माहिती व प्रसारण मंत्री म्हणून काम करत असताना त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांनी संसदेत उपस्थित केलेले मुद्दे, त्यांची भाषणे आमच्यासाठी दिशादर्शक आणि समृद्ध असा अनुभव देणारी ठरली आहेत.

गेल्या काही वर्षांपासून लालकृष्ण आडवाणी सक्रिय राजकारणातून अलिप्त राहिले होते. जानेवारी महिन्यात राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला. राम मंदिराच्या उभारणीसाठी लालकृष्ण आडवाणी यांनी त्यांच्या उमेदीच्या काळात प्रचंड मोठी चळवळ उभारली. बाबरी मशीदीच्या विवादित जागेवर राम मंदिर व्हावं म्हणून त्यांनीच पुढाकार घेतला होता. त्यामुळे प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्ताने आडवाणी पुन्हा एकदा चर्चेत आले होते. सुरुवातीला त्यांच्या प्रकृती अस्वस्थ्यामुळे त्यांना निमंत्रण नाकारण्यात आलं होतं. यावरून प्रचंड गदारोळ झाला. अखेर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी कृष्ण गोपाल, राम लाल आणि विहिंपचे आलोक कुमार यांनी लालकृष्ण अडवाणी यांच्या घरी जाऊन प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी आमंत्रित केलं होतं. परंतु, प्राणप्रतिष्ठा दिनी अयोध्येत तापमान घसरलं होतं. थंडी वाढली होती, त्यामुळे लालकृष्ण आडवाणी यांनी तिथे जाणं टाळलं.

२०१५ साली मिळाला होता पद्मविभूषण पुरस्कार

२०१५ मध्ये आडवाणी यांना देशाचा दुसरा । पान २ वर

# उजनी पाईप लाईनसाठी २६७ कोटींचा निधी देणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

*** सांगोल्याच्या धरतीवर अन्य प्रादेशिक पाणी पुरवठा योजना राबववून लोकांना पाणीपुरवठा करावा . *टंचाईचे गांभीर्य लक्षात घेऊन बियाणे महामंडळाने सोलापूर जिल्ह्याला चारा बियाणे प्राधान्याने उपलब्ध करून द्यावे. *जिल्ह्यात महिला व बाल विकास भवन निर्माण करा. * प्रत्येक शासकीय कार्यालयासाठी सोलर पॅनल बसवून कार्यालयाचा वीज खर्च कमी करावा. *पंढरपूर देवस्थान आराखड्यातर्गंत कामे करत असताना लोकभावना लक्षात ठेवून कामांमध्ये नाविन्यता आणावी.**

सोलापूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत सोलापूर महापालिकेला उजनी येथून पाईपलाईन टाकण्यासाठी आवश्यक असलेला राज्य शासनाचा २६७ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्यातील सुमारे ९० कोटींचा पहिला हप्ता पुढील दोन दिवसांत देण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी दिली.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित जिल्ह्यातील विविध विकास कामांच्या आढावा बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. यावेळी आमदार यशवंत माने, आमदार संजय शिंदे,। पान २ वर



## मराठा आरक्षण सल्लागार समितीची बैठक संपन्न



मुंबई : मराठा आरक्षणकरिता झालेल्या आंदोलनाच्या अनुषंगाने जारी करण्यात आलेली सगेसोयरेबाबतची अधिसूचना, त्याचबरोबर आतापर्यंत केलेली कार्यवाही, आरक्षणबाबत विविध न्यायालयातील याचिकांबाबत चर्चा करुन सर्वेक्षणाचे काम करणाऱ्या सर्व अधिकारी कर्मचारी यांचे न्यायमूर्ती डी.बी. भोसले (निवृत्त) यांनी अभिनंदन केले. मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने नेमलेल्या न्यायमूर्ती भोसले (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या निवृत्त न्यायमूर्तींच्या समितीची आज सह्याद्री अतिथी गृह येथे बैठक झाली.

न्यायमूर्ती भोसले (निवृत्त) यांनी राज्य मागासवर्ग आयोग आणि त्यांची संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा तसेच ज्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी विक्रमी वेळेत सर्वेक्षण केले. त्या सर्वेक्षण करणाऱ्या सर्व सदस्यांचे कौतुक केले. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) आणि त्यांच्या संपूर्ण पथकाचे तसेच मोठ्या प्रमाणातील नोंदी शोधण्याकरीता कार्यरत अधिकारी, कर्मचारी यांनी घेतलेल्या परिश्रमाचे कौतुक केले.

या बैठकीमध्ये न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखालील नेमलेल्या समितीने केलेल्या आतापर्यंतच्या कार्यवाहीचा आढावा घेतला. कुणबी नोंदी शोधण्याकरिता करत असलेले विशेष कक्षामार्फतची कार्यवाही, तसेच समितीचा पहिला आणि दुसरा अहवाल दिल्यानंतर समितीच्या कालावधीत शोधलेल्या विविध नोंदी असणाऱ्या कुणबी वारसदारांना देण्यात आलेल्या प्रमाणपत्राच्या अनुषंगाने झालेल्या । पान २ वर

## भारतीय राजमार्ग अभियंता अकादमीचा नगरविकासबरोबर, तर राष्ट्रीय राजमार्ग वाहतूकचा सार्वजनिक बांधकाम विभागाबरोबर सामंजस्य करार

मुंबई : राज्यातील पर्यटन वृध्दी होऊन रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी रोप वे करीता निश्रि्चत केलेल्या ४० ठिकाणांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तातडीने सादर करावा, असे निर्देश देतानाच राज्यातील ८१ रस्ता प्रकल्पांच्या कामासाठी १६०० कोटी रुपये मंजूर करण्यात येतील, असे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज येथे सांगितले.

भारतीय राजमार्ग अभियंता अकादमी आणि राज्य शासनाचा नगरविकास विभाग यांच्या दरम्यान राज्यातील सहा शहरातील वाहतूक कोंडी समस्यांवर उपाययोजना सुचविण्यासाठी आणि राष्ट्रीय राजमार्ग वाहतूक व्यवस्थापन कंपनी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यात रोप वे उभारणी बाबत आज दुपारी सह्याद्री अतिथिगृह येथे सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.



त्यावेळी केंद्रीय मंत्री श्री. गडकरी बोलत होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री श्री. गडकरी म्हणाले की, राष्ट्रीय राजमार्ग वाहतूक व्यवस्थापनाबरोबरच्या सामंजस्य करारामुळे रोप वे विकसित केले जातील. राज्यातून ४० प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी सहा ठिकाणच्या प्रकल्पांची निविदा प्रक्रिया सुरु आहे. या प्रकल्पांसाठी आवश्यक असणारा निधी केंद्र सरकार देईल. राज्य शासनाने प्रकल्पांसाठी आवश्यक असणारी जमीन उपलब्ध । पान २ वर

# अक्कलकोट येथे बौद्धधर्मीय लोकावरील अन्याय विरोधात उद्या आक्रोश मोर्चा

## आंबेडकरी समुदायानी ५ फेब्रुवारीला आक्रोश मोर्चात हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे



**गेल्या अनेक वर्षापासून बेडर गल्ली येथे पाण्याचे वॉल काही समाजकंटक तोडत असून या बाबत वेळोवेळी नगर परिषद मुख्याधिकारी यांना सांगत आले आहे यावर त्वरित कार्यवाही करण्यात यावे व भीमनगर येथील पाणीपुरवठा टाकी काम त्वरित पूर्णकरून सर्वांना घरोघरी नळ कनेक्शन दिल्यास पाणी समस्या मिटणार असल्याचे माहिती अविनाश मडिखांबे यांनी केले व संदीप मडिखांबे यांनी स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ जवळील चौकात सी सी टिव्ही कॅमेरे बसविण्यात यावे व आमच्या युवकाचे रिक्षा व्यवसाय करून घर चालवत असतात त्या ठिकाणी गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी दादागिरी करून त्रास देण्याचे काम चालू असून तेथील पोलीस चौकी चोवीस तास चालू ठेवण्यात यावे याची मागणी ही मोर्चात करण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी बोलताना सचिन बनसोडे म्हणाले की आंबेडकरवादी समाजावर होणाऱ्या अत्याचार विरोधात तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने मोर्चासाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे आज आपल्या बांधवांवर अन्याय झालंय उद्या हे प्रसंग आपल्या येऊ शकतो यासाठी आपण जागृत होऊन आंबेडकरवादी समाजाने मोठ्या संख्येने सहभाग होऊन शांतता व संयम मार्गाने मोर्चात आपले ताकद दाखवणे गरजेचे आहे भविष्यात अशा प्रकारे घटना घडणार नाही यासाठी आपली एकीची ताकद तालुक्याला दाखवण्यासाठी मोर्चात हजारोच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन केले**

अक्कलकोट/यश सिध्दी न्युज नेटवर्क :

गेल्या काही एक-दोन वर्षापासून अक्कलकोट तालुक्यात बौद्ध धर्मीय लोकावर काही समाजकंटकाकडून अन्याय अत्याचार केला जात आहे.त्यांच्या निषेधार्थ म्हणून ५ फेब्रुवारीला भव्य आक्रोश मोर्चाचे आयोजन केले आहे.तरी तालुक्यातील आंबेडकरी समुदाय मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली ताकद दाखवावे असे आवाहन पत्रकार परिषदेत सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी केले आहे. या वेळी माजी नगरसेवक उत्तम गायकवाड, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे, वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, छात्र भारती प्रदेश संघटक सचिन बनसोडे, युवक आघाडी अध्यक्ष शीलामणी बनसोडे, शिव बसव आंबेडकर संस्थेचे अध्यक्ष संदीप मडिखांबे,प्रहार संघटना तालुकाध्यक्ष अमर शिरसाट,पीपल्स रिपब्लिकन पार्टी रोजगार आघाडी प्रदेश अध्यक्ष विकी बाबा चौधरी, शहर अध्यक्ष अजय मुकणार , सम्यक विद्यार्थी तालुकाध्यक्ष रवी पोटे, बी एस पी तालुकाध्यक्ष विठल आरेनवरु, पी आर पी तालुकाध्यक्ष बाळासाहेब खैराटकर उपस्थित होते

विविध मागण्यांसाठी ५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता अक्कलकोट भिमनगर ते राजे फत्तेसिंह चौक, तूप चौक मेन रोड बस स्टॉप ए-वन चौक या प्रमुख मार्गावरून भव्य आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले असुन ए-वन चौक येथे सभेचे आयोजन करण्यात आले आहे हा मोर्चा शांततेत होणार असल्याचे सांगितले

सदर मोर्चा कुठल्या जाती धर्मा विरोधात किंवा कुठल्या पक्षाविरोधात नसून आंबेडकवादी समाजावर अन्याय करणाऱ्या नीच प्रवृत्ती विरोधात मोर्चा आहे. यावेळी बोलताना चंद्रशेखर मडीखांबे म्हणाले की, अक्कलकोट शहर व ग्रामीण भागातील बौद्ध बांधवांवर मोठ्या प्रमाणात होत असलेला अन्याय अत्याचार,जातीयवाद आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची गुलबर्गा येथे विटंबना करण्यात आला आहे.घोळसगांव येथे एका व्यक्तीने मकर संक्रांतीच्या दिवशी त्याच्या धार्मिक विधीमध्ये आपल्या जातीवरून कन्नड मध्ये एकदम तुच्छ व खालच्या पातळीवर जाऊन शिरवाळ भाषा, व बणजगोळ येथील जिल्हा परिषद शाळेत लहान मुलांना निळ्या रंगाचा गणवेश घालण्यास बंदी घाला म्हणणाऱ्या जातीवादी उपसरपंच यांच्यावर कार्यवाही करण्याबाबत,हालहळळी येथे गावच्या यात्रेत महार जातीचे लोकांनी यायचे नाही,म्हणून समाजातील माजी सरपंचाच्या भावाला बेदम मारहाण करून त्याच्यावरच महिलेना छेडछाड केल्याची खोटी केसेस केले आहेत व हंजगी येथील जातीयवादी माजी सरपंच यांना केवळ मागासवर्गीय व दिव्यांग सदस्य निवडून आल्यानंतर एका उच्च जातीच्या महिलेने आरती का केली म्हणून त्या महिलेला व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य यांना त्रास दिला जात आहे. याबाबत आक्रोश मोर्चा निघत असल्याचे सांगितले तालुक्यातील बौद्ध धर्मीय लोकांवर मोठया प्रमाणात अन्याय वाढला आहे.या सर्व होत असलेल्या अत्याचारा विरुद्ध व अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे.हा अन्याय आज त्यांच्यावर तर उद्या आपल्यावर हि वेळ येऊ शकते.यासाठी समाजातील सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची आवाहन केले आहे

तरी सर्वांनी आपापसातील व्यक्तीक व राजकीय मतभेद विसरून सर्वांनी एकत्र येऊन परिवारासह ह्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होऊन जातीयवादी लोकांना आपली ताकद दाखवून द्यावे असे आवाहन पत्रकार परिषदमध्ये आयोजक समितीने केले आहे

## संपादकीय

### 'तेल' कोणते ओतणार..

देशभरातील ५६ राज्यसभा सदस्य निवृत्त होत असून येत्या २७ फेब्रुवारी रोजी ही निवडणूक होणार आहे. विरोधकांनी 'इंडिया' ही आघाडीदेखील स्थापन केली आहे. पण लोकसभा निवडणुकांचा बिगुल वाजायच्या आतच एकेकाने यातून काढता पाय घेतला आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी केंद्रातील भाजपला धूळ चारण्याचा विडा उचलला होता. त्यासाठी मोदी विरोधकांनी एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले होते. त्यासाठी पहिली बैठक त्यांनी बिहारमध्ये घेतली होती. अशी जय्यत तयारी सुरू असताना अचानक त्यांनी भाजपच्या तंबूत शिरून सगळ्यांना आश्चर्याचा धक्का दिला. तृणमूल काँग्रेस आणि आम आदमी हे इंडिया आघाडीतून बाहेर पडतील हे अपेक्षितच होते. दोघांनी 'स्वबळा'चा दिलेला नारा हा कोणालाही अचंबित करणारा नव्हता, पण आता प्रत्यक्षात निवडणूक प्रक्रियेला जेव्हा सुरुवात होईल तेव्हा ही आघाडी राहते का? राहिलीच तर या आघाडीत नक्की किती पक्ष असतील हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांच्यातील मतभेद सर्वश्रुत आहेत. पण मतविभागणी टाळण्यासाठी राष्ट्रवादीने वंचित आघाडीला सोबत घेण्याची तयारी दर्शवली आहे. काँग्रेसच्या दृष्टीने वंचित आघाडीच अडचणीची ठरली आहे. काँग्रेसने वंचित आघाडीला कायम भाजपची 'बी' टीम म्हणून हिणवले आहे. २०१९ च्या निवडणुकीनंतर ही टीका अधिकच तीव्र झाली होती. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेवरही आंबेडकर यांनी टीका केली होती. २०१९ च्याच लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये दोन्ही काँग्रेसची आघाडी होती. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आघाडीचे सुमारे १५ उमेदवार, तर विधानसभा निवडणुकीत ३२ उमेदवार पराभूत झाले. आताही घोडे अडले आहे ते काँग्रेसच्या पत्रावर. शिवाय केंद्रातील भाजपला हरवण्याला सर्वोच्च प्राधान्य असल्याने कोणताही अहंम बाळगणार नाही, असे सांगणाऱ्या वंचितने महाविकास आघाडीसमोर आणखी काही अटी ठेवल्या आहेत. त्यांना प्रामुख्याने प्रत्येक पक्षाचा काय अजेंडा आहे? तूर्तास जागावाटपाचे सूत्र काय आहे? किमान समान कार्यक्रम काय असेल हे जाणून घ्यायचे आहे. वंचितला नाममात्र सहभाग नकोय. एकूणच वंचितच्या दिव्याच्या प्रकाशात महाविकास आघाडीच्या विजयाची वाट उजळण्याची शक्यता असली तरी काँग्रेस त्यात 'तेल' कोणते ओतणार यावर सर्व अवलंबून आहे.

# एकमेकांना ढुसण्या नको; अन्यथा गाठ माझ्याशी; अजितदादांनी पदाधिकार्यांचे टोचले कान

सोलापूर, ( प्रतिनीधी )दि.४- एक अपवाद वगळता कार्यकर्त्यांनी घाम गाळल्यानेच राष्ट्रवादी कायम सत्तेत राहिली आहे. आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी अधिक मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांना व नव्याने पक्षात आलेल्यांना सन्मानाची वागणूक द्या. केवळ आपापसात एकमेकांना ढुसण्या मारू नका, अन्यथा गाठ माझ्याशी आहे, हे लक्षात ठेवा, असा सज्जड दम भरत राष्ट्रवादीचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, शहराध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, अल्पसंख्याक आघाडीचे वसीम बुर्हाण यांच्यासह अन्य प्रमुख पदाधिकार्यांचे कान टोचले.

शनिवारी, जुनी मिल कंपाउंड येथे शहर राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाच्या कार्यालयाचे उद्घाटन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर आयोजित केलेल्या कार्यकर्ता संवाद मेळाव्यात अजित पवार बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार संजय शिंदे, पक्षाचे प्रवक्ते उमेश पाटील, कामगार नेते कुमार करजगी, प्रदेश सचिव शफी इनामदार, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, लतीफ तांबोळी, प्रदेश युवक अध्यक्ष सूरज चव्हाण, युवती प्रदेशाध्यक्षा सोनाली गाडे, शहर युवक अध्यक्ष सुहास कदम, आनंद मुस्तारे, महेश निकंबे, स्वागता शहा यांच्यासह अजितदादा गटात प्रवेश केलेले माजी आमदार रविकांत पाटील, बिज्जू प्रधाने, सुभाष डांगे, मंदाकिनी तोडकरी, कल्पना क्षीरसागर, किशोर पाटील उपस्थित होते. प्रारंभी शहराध्यक्ष संतोष पवार यांनी प्रास्ताविक तर कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी स्वागत केले.



पदाधिकार्यांनी आपल्यातील एकजूट कायम ठेवून सोलापूर शहर राष्ट्रवादीमय करण्यासाठी पक्ष कार्यालयामार्फत जनतेची कामे करा. आपण शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचाराने पुढे चाललो आहोत. बदल घडविण्यासाठी धाडस करायचे असेल तर काही निर्णय घ्यावे लागतात. तो निर्णय मी घेतला आहे. रे नगरप्रमाणे इतरही भागात गरिबांसाठी घरकुले उभारावी लागणार आहेत. त्यासाठी कार्यकर्त्यांनी मनापासून काम करून पक्षवाढीसाठी हातभार लावावा. जबाबदारी ओळखून काम करा आणि उद्याच्या निवडणुकीत आपण एक आहोत, हे दाखवून द्या.

कोणत्याही कार्यकर्त्याला कमी लेखू नका. प्रत्येकाला सन्मानाची वागणूक द्या. सकाळी लवकर उठा आणि पक्ष कार्यात झोकून द्या असे सांगत संतोष पवार, किसन जाधव आणि जुबेर बागवान यांना सकाळी किती वाजता उठता असा प्रश्न करून अजितदादांनी भर मेळाव्यात पंचाईत केली. वसीम बुर्हाण, लतीफ तांबोळी यांनाही कुरवाळत शब्दाचे मार दिले. यावेळी तटकरे, चाकणकर यांची भाषणे झाली.

**महाराष्ट्रात नवे पर्व सुरू**

**अजित पवार सत्तेत सहभागी झाल्यानंतर राज्याच्या विकासाला गती आली असून या माध्यमातून राष्ट्रवादी अजितदादांच्या नेतृत्वाखाली एक प्रबळ शक्ती म्हणून पुढे येत आहे. एकूणच महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात एक नवे पर्व सुरू झाले आहे. सोलापुरातही संतोष पवार, किसन जाधव आणि जुबेर बागवान यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची ताकद निश्र्चितच वाढेल, असा विश्र्वास प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केला.**

पान १ वरुन

## लालकृष्ण आडवाणींना भारतरत्न..

सर्वोच्च नागरी सन्मान पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्याच वर्षी माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांना भारतरत्न प्रदान करण्यात आला. तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी स्वत: त्यांच्या घरी भेट दिली आणि त्यांना हा सन्मान दिला होता. त्यावेळी वाजपेयी ९० वर्षांचे होते आणि ते आजारी होते. मुखर्जी यांनी प्रोटोकॉल मोडून माजी पंतप्रधानांना त्यांच्या कृष्ण मेनन मार्गावरील निवासस्थानी हा पुरस्कार प्रदान केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून अभिनंदन

प्रखर राष्ट्रभक्त अशा ज्येष्ठ नेते आडवाणी यांनी आपले अखंड आयुष्य समाजकारण आणि राजकारण यासाठी समर्पित केले आहे. अयोध्येत प्रभु श्रीरामचंद्राचे मंदिर व्हावे हे त्यांचे स्वप्न देखील साकार झाले आहे. या मंदिरासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, रथयात्रेचे नेतृत्व या गोष्टी त्यांच्या प्रभावी नेतृत्वशैलीचे उदाहरण आहे. देशाच्या सर्वांगीण विकासाची दृष्टी असणारे आणि सर्वसमावेशक असे त्यांचे नेतृत्व आमच्यासाठी प्रेरणादायी आणि आदरणीय आहे. उत्तम संसदपटू आणि परखड विचारांचे नेतृत्व अशी त्यांची ओळख आहे. त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार जाहीर होणे अत्यंत आनंददायी बाब आहे. त्यांना उत्तम आयुरारोग्य आणि दीर्घायुष्य लाभावे, असे अभिष्टचिंतन करून मुख्यमंत्र्यांनी ज्येष्ठ नेते आडवाणी यांचे भारतरत्न पुरस्कारासाठी अभिनंदन केले आहे.

## उजनी पाईप लाईनसाठी २६७

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त शितल तेली-उगले, शहर पोलिस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार, एमजीपीचे कार्यकारी अभियंता अनिल पाटील, माजी आमदार दीपक साळुंखे यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, सोलापूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेअंतर्गत उजनी धरणातून १७० दशलक्ष लिटर पाणी सोलापूर शहराला दररोज आणण्यासाठी ८९४ कोटींचा प्रकल्प मंजूर केलेला आहे. या अंतर्गत कामे सुरू आहेत. राज्य शासनाचा २६७ कोटींचा हिस्सा लवकरच देण्यात येणार असून, त्यातील पहिला टप्पा सुमारे ९० कोटी पुढील दोन दिवसात उपलब्ध करून देण्यात येतील. तरी महापालिकेने या अनुषंगाने पुढील कामे त्वरित पूर्ण करून सोलापूर शहरातील नागरिकांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले.

त्याप्रमाणेच सोलापूर शहर महापालिकेला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडून जुना पुना नाका ते पत्रकार भवन व जुना बोरामणी नाका ते मोरारका बंगला असे दोन उड्डाणपूल मंजूर असून भूसंपादनासाठी १०१ कोटींचा शासन हिस्साही लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच उजनी धरण पाणी पातळी कमी झाल्याने शहरातील लोकांना नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी दुबार व तिबार पंपिंग महापालिकेला करावे लागते, त्यासाठी आवश्यक असलेला ३.५४ कोटीचा तर हुतात्मा स्मृती मंदिराच्या नूतनीकरणासाठी ३.३६ कोटीचा निधी उपलब्ध करून देणार असल्याचे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

यावर्षी पाऊस कमी झाल्याने जिल्ह्यात टंचाई सदृश्य परिस्थिती आहे, त्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत ज्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सुरू आहेत त्यातून प्रत्येक गावात पाणीपुरवठा झाला पाहिजे यासाठी सांगोला प्रादेशिक पाणीपुरवठा योजना चांगल्या प्रकारे चालवली जात आहे, तरी याच धरतीवर जिल्ह्यातील सर्व प्रादेशिक पाणीपुरवठा योजना संबंधित यंत्रणांनी चालवल्या पाहिजेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. तसेच जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन प्रत्येक गावात आवश्यक त्या ठिकाणी पाणीपुरवठा उपाययोजना कराव्यात. तसेच जनावरांना माहे जून २०२४ अखेरपर्यंत चारा उपलब्ध होईल यासाठी काटेकोरपणे नियोजन करावे, असे निर्देश देऊन बियाणे महामंडळाने टंचाई परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सोलापूर जिल्ह्याला चारा बियाणे तात्काळ उपलब्ध करून द्यावे, असेही त्यांनी निर्देशित केले.

पंढरपूर देवस्थान आराखड्यातर्गत ७३ कोटींचा निधी मंजूर असून, या अंतर्गत पुरात्व विभाग काम करत असून माहे मार्च २०२४ पर्यंत त्यांना आवश्यक असलेला पाच कोटीचा निधी त्वरित देण्यात येत आहे. या अंतर्गत कामे करत असताना पुरात्व विभागाने लोक भावना लक्षात घेऊन कामामध्ये वेगळेपणा व नाविन्यता आणावी. यासाठी उज्जैन अयोध्या व वाराणसी येथे जाऊन तेथील मंदिराचे केलेले नूतनीकरण कामाची पाहणी करून माहिती घ्यावी व त्या पद्धतीने येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये कशा पद्धतीने चांगल्या व दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना श्री. पवार यांनी दिल्या.

जिल्ह्यात महिला व बाल विकास भवन निर्माण करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा. यासाठी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी जागा उपलब्ध करून घ्यावी. या ठिकाणी महिला बचत गटांच्या वस्तूंच्या विक्रीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय कार्यालयास सोलर पॅनल बसवण्याबाबत आराखडा तयार करावा व प्रत्येक शासकीय कार्यालयात सोलर पॅनल बसवून वीजे वरील खर्च कमी करावा. होटगी रोड विमानतळ येथे सुरू असलेली कामे त्वरित मार्गी लावून हे विमानतळ लवकर सुरू करण्याबाबत प्रशासनाने प्रयत्न करावेत. तसेच जिल्हा नियोजन समितीचा मंजूर असलेला ४९० कोटींचा निधी आचारसंहिता लागण्यापूर्वी शंभर टक्के खर्च होईल यासाठी सर्व शासकीय यंत्रणानी प्रयत्न करावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्ह्यातील पाणी व चारा टंचाईच्या अनुषंगाने माहिती दिली. जिल्ह्यातील पाच तालुके(बार्शी, माळशिरस, सांगोला, करमाळा व माढा) दुष्काळी तालुके म्हणून जाहीर केलेले असून ४५ महसूल मंडळातही दुष्काळ जाहीर केलेला आहे. प्रशासनाने ५५ कोटीचा टंचाई आराखडा तयार केलेला असून सद्यस्थितीमध्ये चार गावांमध्ये चार टँकरने पाणीपुरवठा सुरू असून, पुढील ११५ दिवस पुरेल एवढा चारा जिल्ह्यात उपलब्ध आहे. तर जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून चारा बियाण्यांसाठी ८ कोटीचा निधी मंजूर केलेला असून त्यातील ३.५० कोटीच्या निधीतून चारा बियाणे खरेदी केले असून उर्वरित ४.५० कोटी निधी त्वरित पशुसंवर्धन विभागाला चारा खरेदीसाठी उपलब्ध केला जाणार आहे. जिल्हा प्रशासन पाणी व चारा टंचाई परिस्थितीवर लक्ष ठेवून असून जिल्ह्यात कोठेही पाणी अथवा चाऱ्याची टंचाई भासणार नाही यासाठी उपाययोजना करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जिल्हा नियोजन समितीचा मंजूर असलेला निधी शंभर टक्के खर्च होईल यासाठी नियोजन केल्याची माहितीही त्यांनी दिली.

महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी सोलापूर महापालिकेच्या वतीने करण्यात येत असलेल्या विविध विकास कामांची तसेच एसटीपी प्रकल्प, ड्रेनेज प्रकल्प व वाढीव पाणीपुरवठा योजना, रस्ते तसेच उड्डाणपुलाच्या कामांची माहिती दिली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कोहिनकर यांनी जिल्हा परिषद अंतर्गत सुरू असलेल्या विविध विकास कामांची माहिती बैठकीत सादर केली. तर तेजस्विनी आफळे यांनी पंढरपूर देवस्थान विकास आराखड्याची माहिती दिली.

श्री सिद्धेश्र्वर यांचे दर्शन- उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्र्वर यांचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी मंदिर परिसराची पाहणी केली.

## मराठा आरक्षण सल्लागार

कार्यवाहीबाबत आणि समितीस देण्यात आलेल्या मुदत वाढीपर्यंत करावयाची कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा झाली.

न्या. भोसले यांनी आंदोलनाच्या अनुषंगाने ज्या कुशलतेने सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे आणि त्यांच्या संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेने हाताळलेले कौशल्य याबद्दल त्यांचे अभिनंदन करून धन्यवाद दिले.या बैठकीस न्या. मारोतराव गायकवाड, (निवृत्त) न्या. संदीप शिंदे (निवृत्त) उपस्थित होते. सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, सुवर्णा केवले, आरक्षणाच्या अनुषंगाने नेमण्यात आलेले विधीज्ञ अभिजित पाटील, वैभव सुखदरे आणि अक्षय शिंदे यांच्यासह संबंधित विभागातील मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी, उपस्थित होते.

## भारतीय राजमार्ग अभियंता अकादमीचा

करुन द्यावी.

श्री. गडकरी यांनी सांगितले की, रोप वे ची निर्मिती करतानाच त्या भागात पर्यटकांसाठी पार्किंग सुविधा, निवास, भोजनाच्या व्यवस्था विकसित कराव्यात. त्यामुळे पर्यटकांच्या संख्येत वाढ होईल. रोप वे तयार करतानाच त्या भागातील उत्पादने विक्रीसाठी बाजारपेठ विकसित करावी. तसेच वाहनांच्या चार्जिंगसाठीची सुविधा उपलब्ध करून देतानाच सौर ऊर्जा वापरासाठी प्राधान्य द्यावे.

सर्वत्र नागरीकरण वाढत आहे. अशा परिस्थितीत वाहतुकीच्या नियोजसाठी शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करणे आवश्यक आहे. अभियंता अकादमीच्या माध्यमातून अभ्यास होऊन वाहतूक सुलभ होऊन अपघात कमी होण्यास मदत होईल, असे श्री. गडकरी यांनी सांगितले. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या शहरातील वाहतूक कोंडीचा अभ्यास करुन उपाययोजना सुचविल्या जाणार आहेत.

मंत्री श्री. चव्हाण म्हणाले की, राष्ट्रीय राजमार्ग वाहतूक व्यवस्थापनाबरोबरच्या करारामुळे पर्यटनाला चालना मिळेल. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी राज्य शासनातर्फे आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. तसेच नगर विकास विभागाच्या करारामुळे वाहतुकीचे नियोजन करणे सोयीस्कर होईल. वाहतुकीच्या अभ्यासासाठी निवडलेल्या शहरांमध्ये स्मार्ट सिटी साठी निवडलेल्या शहरांचा समावेश करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

श्रीमती म्हैसकर म्हणाल्या की, रोप वे सामंजस्य करारामुळे राज्यातील निसर्ग रम्य, ऐतिहासिक, धार्मिक स्थळे जोडली जातील. त्यामुळे पर्यटकांना सुविधा उपलब्ध होतील. त्यामुळे राज्यातील पर्यटनाला चालना मिळेल. श्री. गुप्ता म्हणाले की, अभियंता अकदामी बरोबर च्या सामंजस्य करारामुळे वाहतुकीचा शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास होईल. पहिल्या टप्प्यात यामध्ये राज्यातील सहा शहरांचा समावेश आहे, असे सांगितले. यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य अभियंता संतोष शेलार, मनोजकुमार फेगडे अतिरिक्त परिवहन आयुक्त जितेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

# स्वेरीत 'अभियांत्रिकी शिक्षणाचे महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन सत्र

## आयआयटी मुंबई चे संचालक प्रा.डॉ. सुभाषिश चौधरी यांचे बहुमोल मार्गदर्शन




पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये संशोधन विभागांतर्गत प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मध्ये 'अभियांत्रिकी शिक्षणाचे महत्त्व' या विषयावरील मार्गदर्शन सत्र नुकतेच संपन्न झाले. त्या अनुषंगाने आयआयटी, मुंबई चे संचालक प्रा. डॉ. सुभाषिश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

दीपप्रज्वलनानंतर स्वेरीचे युवा विश्र्वस्त प्रा.सुरज रोंगे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. प्रास्तविकात शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार यांनी या कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. प्रा. डॉ. सुभाषिश चौधरी हे आपल्या मार्गदर्शनातून 'मूलभूत अभियांत्रिकीचे महत्त्व' याबद्दल सविस्तर माहिती देताना म्हणाले की, 'तुम्ही स्वतःचा स्पेस शोधा, स्वतःच्या क्षमता व कमतरता ओळखा. आपल्या कमतरता कशा कमी करता येतील आणि क्षमता भक्कम कशा होतील यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करा व त्यासाठी पाठपुरावा करा. अभ्यास करताना अनावश्यक गोष्टींवर बंधने घालावीत आणि त्यामुळेच ध्येय साध्य करताना आपल्यामध्ये एकाग्रता निर्माण होईल. त्यामुळे यश देखील लवकर मिळेल. इंजिनिअरिंगमध्ये संशोधन आणि निरीक्षण या खूप महत्त्वाच्या बाबी असतात. मूलभूत अभियांत्रिकीचा उपयोग करूनच अत्याधुनिक साधने तयार केली जातात कारण विज्ञानाचा मूळ पाया हा निरीक्षणच आहे. त्यामुळे प्रायोगिक पद्धती वापरून वेगवेगळ्या स्वरूपाचे संशोधन करावे लागते.' असे सांगून डॉ. सुभाषिश चौधरी यांनी अभियांत्रिकी शिक्षणाचे महत्व विशद केले. यावेळी श्रेयस कांबळे, ऋतुराज कोरे यांच्यासह इतर विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकीच्या संदर्भात अनेक प्रश्न विचारले. त्या प्रश्नांना डॉ. चौधरी यांनी समर्पक उत्तरे दिली. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिलेल्या या कार्यक्रमात संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ. अमरजित केने, प्लेसमेंट विभागाचे प्रा. अविनाश मोटे, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.मिनाक्षी पवार, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.दीप्ती तंबोळी, डॉ. हर्षवर्धन रोंगे, तसेच इतर प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. संस्थेचे युवा विश्र्वस्त प्रा.सुरज रोंगे यांनी आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी महापालिकेच्या इंद्रभुवन इमारतीस भेट देऊन पाहणी केली

## उपमुख्यमंत्र्याकडून इंद्रभुवन इमारतीच्या झालेल्या नूतनीकरण कामाचे कौतुक

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर शहराला ऐतिहासिक वारसा आहे. महाराष्ट्र राज्यात मुंबई महानगरपालिका नंतर सोलापूर महानगरपालिकेची इमारत ही एकमेव हेरिटेज(ऐतिहासिक वारसा) इमारत आहे. या ऐतिहासिक वास्तूचे स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत नुकतेच नूतनीकरण करण्यात आलेले आहे. या नूतनीकरण करण्यात आलेल्या इंद्रभुवन इमारतीला राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी सदिच्छा भेट देऊन येथे झालेल्या नूतनीकरण कामाची पाहणी केली व त्याबद्दल समाधान व्यक्त करून महापालिकेने केलेल्या कामाचे कौतुक केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, नगर अभियंता सारिका आकूलवार, उप अभियंता युसुफ मुजावर यांच्यासह महापालिकेचे अन्य अधिकारी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूर महापालिकेच्या इंद्रभुवन इमारतीचे सूक्ष्म निरीक्षण केले. ऐतिहासिक वारसा असलेल्या इमारतीमध्ये नूतनीकरणात करण्यात आलेल्या कामांची माहिती घेऊन प्रत्यक्ष कामाची पाहणी केली. या इमारतीचे नूतनीकरण महापालिकेने अत्यंत उत्कृष्टपणे करून घेतल्याबद्दल समाधान व्यक्त करून त्यांनी महापालिकेचे कौतुक केले. तसेच पाहणी करत असताना त्यांना आढळलेल्या त्रुटीबाबत महापालिका आयुक्तांना सांगून त्यात आवश्यक ते बदल करण्याविषयी सूचना दिल्या. तसेच या इमारतीच्या मूळ सौंदर्याला धक्का बसणार नाही यासाठी महापालिकेने उचित पावले उचलावी असेही त्यांनी सांगितले.

प्रारंभी महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी सोलापूर महापालिकेने इंद्रभुवन इमारतीचे केलेल्या नूतनीकरण विषय कामकाजाची माहिती उपमुख्यमंत्री महोदय यांना दिली. राज्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेनंतर ऐतिहासिक वारसा असलेली सोलापूर महापालिका ही एकमेव महानगरपालिका असल्याचे त्यांनी सांगितले. या इमारतीच्या मूळ सौंदर्याला कोणत्याही प्रकारचा धक्का न लावता इमारतीचे नूतरीकरण करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# शिक्षण विस्तार अधिकारी भीमाशंकर वाले यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार.

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट पंचायत समिती शिक्षण विभागातील शिक्षण विस्तार अधिकारी भीमाशंकर वाले यांचा ३१ जानेवारी रोजी नुकतेच सेवानिवृत्त झाले.त्या प्रित्यर्थ बीट मधील कडबगाव उडगी केंद्राच्या वतिने सपत्नीक सत्कार करण्यात आला. गौडगांव बुखख(ता.अक्कलकोट)येथील श्री जगदगुरू पंचाचार्य प्रशालेत माहे जानेवारी २०२४ शिक्षण परिषदेचे आयोजित केले होते.त्याप्रसंगी भीमाशंकर वाले यांचा उपस्थित सर्व कुटुंबाचा सत्कार करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अक्कलकोट



पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी हरिश्र्चंद्र गायकवाड हे होते.यावेळी केंद्रप्रमुख भीमाशंकर धडके,मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी,पंडित गुरव, (शा.पो.आ) लखप्पा पुजारी,रियाज सुतार,मुक्ताबाई वाले,बसवराज खिलारी,बसवराज गौडनळी,विद्याधर गुरव उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना भीमाशंकर वाले बोलताना म्हणाले की,शिक्षकांनी शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रामाणिकपणे अध्यापनासाठी प्रयत्न करावे.विद्यार्थी आपले देशाची संपत्ती आहे. त्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेकडे लक्ष केंद्रित करावे.विद्यार्थ्यांना गुणवत्ताधारक शिष्यवृत्तीधारक विविध क्षेत्रांमध्ये यश मिळवण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावे.माझ्या सेवेच्या कारकिर्दीमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांचे प्रगती कशी होईल याकडे मी जातीने लक्ष दिलेला. असे ते म्हणाले.यावेळी मल्लिनाथ मैत्री,अप्पू उमराणीकर,संगना फताटे,बसवराज येळमेली,गुरुनाथ नरूने,करपे, रायकोटी,सट्टे,सलगरे,शेख,रमेश कोळी,त्रिभुवन जाधव ,प्रकाश कोळी,कल्याणी गंगोंडा,सिद्धाराम तेग्गेली, बसराज धनशेट्टी,रमेश सोलापुरे,माळाप्पा पुजारी, तोळणुर,उडगी,कडबगाव,नागणसूर,दुधनी,केंद्रातील बहुसंख्या शिक्षक,शिक्षिका उपस्थित होते.वाले यांचा सत्कार करून त्यांच्या उर्वरित आयुष्य सुख समृद्धी. आनंदी व आरोग्यमय जावो,अशा प्रकारची शुभेच्छा व्यक्त करून त्यांना दीर्घायुष्याचे शुभेच्छा दिले.

# अणदूर येथे लिंबराज सुरवसे गुरूजी यांचा सेवानिवृती बद्दल नागरी सत्कार संपन्न

वागदरी/ एस.के.गायकवाड : सराटी ता.तुळजापूर येथील बुध्द फुले शाहू आंबेडकर चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ते तथा जवाहर विद्याय अणदूर ता.तुळजापूर येथील सहशिक्षक लिंबराज तुळशीराम सुरवसे गुरुजी यांचा सेवानिवृत्ती बद्दल अणदूर येथील हुतात्मा स्मारक सभाग्रहात भव्य दिव्य नागरी सत्कार करण्यात आला.

लिंबराज सुरवसे गुरुजी यांनी तब्बल ३३ वर्षे जवाहर विद्यालय अणदूर येथे अत्यंत प्रामाणिकपणे आणि निष्ठेने विद्यार्थी घडविण्याचे कार्य केले आहे.नौकरी करत करत त्यांनी बामसेफ कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून शिक्षकांच्या आडीआडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न केले.महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने परिसरात गावागावांत जावून समाज प्रबोधनाचे काम केले आणि करीत आहेत. अखिल भारतीय साने गुरुजी कथा माला शाखा अणदूरचे पदाधिकारी म्हणून त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

स्वकर्तुत्वाने एक उपक्रमशिल,विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली असून ते नुकतेच शिक्षकियसेवेतून सेवानिव्रत झाले आहेत. त्यांच्या सेवा निव्रत्तीनिमित्ताने जवाहर परिवार व अखिल भारतीय साने गुरुजी कथा मला शाखा अणदूर व मित्रपरिवारांच्या वतीने त्यांच्या नागरी सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार तथा मजी कँबिनेट मंत्री मधुकरराव चव्हाण हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा अध्यक्ष डी.के.कुलकर्णी, सरपंच रामचंद्र दादा अलुरे, प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, प्राचार्य कमलाकर कांबळे,उपजिल्हाधिकारी अविनाश कांबळे (जालना),माजी धाराशिव जि.प.अध्यक्ष शिवदास कांबळे गुरूजी आदी होते.

प्रारंभी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व शिक्षण महर्षी दिवंगत सि.ना.अलुरे गुरुजी यांच्या प्रतिमांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुजन करून सेवानिवृत्त शिक्षक लिंबराज सुरवसे गुरूजी यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी मराठवाडा शिक्षक संघाचे सूर्यकांत विश्र्वासराव,राज्य माध्यमिक शिक्षण महामंडळाचे व्ही.जी.पवार,मुख्याध्यापक संघाचे सुरेश टेकाळे, मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे,सानेगुरुजी कथा मालेचे सुनील पुजारी,मारुती खोबरे गुरुजी, चंद्रशेखर कंदले, प्रा.सुभाष स्वामी, सातप्पा व्हलदुरे, संजय घंटे,व्ही.डी.पाटील, गोपाळ कुलकर्णी, मकरंद पाटील, सामाजिक कार्यकर्ते

डॉ.सुरेश कोरे,प्रबोध कांबळे, आर.एस.गायकवाड,



कैलास गवळी गुरुजी, एस.के.गायकवाड, प्रा.डॉ. महादेव गायकवाड पत्रकार राजेंद्र स्वामी सह जवाहर परिवारातील सर्व मुख्याध्यापक,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव मारुती बनसोडे यांनी केले तर सुत्रसंचलन प्रा.एम.बी.बिराजदार यांनी केले व सन्मान पत्राचे वाचन आणि आभार प्रदर्शन शिक्षक भारतीचे जिल्हा अध्यक्ष भैरवनाथ कानडे यांनी केले.

# विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येय निश्चित केल्यास यश हमखास मिळते : खा डॉ.जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी

अक्कलकोट/प्रतिनिधीः विद्यार्थ्यांनीआपल्या जीवनाच्या दिशा ठरवणे .उद्दिष्ट ठरवणे सर्वस्वी आपल्या हातात आहे आपल्या आवडीचे ध्येय निश्र्चित करून त्या ध्येयावर लक्ष केंद्रित केल्यास जीवनात यश हमखास मिळते असे प्रतिपादन खासदार डॉ.जयसिद्धेश्र्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले.

गौडगाव येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्र्वर कल्याण केंद्र व श्री जगद्गुरु पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने लोकापुरे मल्टीपर्पज हॉल अक्कलकोट येथे दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित



तालुकास्तरीय व्याख्यानमालेच्या उद्धाटनाप्रसंगी महास्वामीजी बोलत होते .

इंग्रजी व गणित या विषयामध्ये आत्मविश्र्वास निर्माण व्हावा. प्रस्तावित नवीन कृतीपत्रिका कशी सोडावी व उत्तर पत्रिका कशी असावी .याविषयी तज्ञ मार्गदर्शक शहाजी ठोंबरे. अंजली शिरशी मॅडम. श्रीकांत सर .विष्णू पाटील. संतोष बिराजदार . यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.प्रारंभी प्रशालेच्या प्राचार्य कल्याणी देशेट्टी यांनी प्रास्ताविक व स्वागत केले यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी भीमाशंकर वाले केंद्रप्रमुख भीमाशंकर धडके,योगीराज हिरेमठ ,शावरू जडगे,मनीराज, हिरेमठ,मुख्याध्यापक बसाया हिरेमठ,एस .बी .गायकवाड व तालुक्यातून विविध शाळेतून आलेले बहुसंख्य विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेतले .सूत्रसंचालन शिवपुत्र चोळे. यांनी केले तर महेश स्वामी यांनी आभार मानले.

# अर्जुनीमोरगाव येथे पाच फेब्रुवारीला महिला मेळावा

## सिनेतारकांची हजेरी : दहिवले दाम्पत्यांचे आयोजन

बाराभाटी : तालुका अर्जुनीमोरगाव येथे दिनांक पाच फेब्रुवारीला दुपारी १२.०० वाजता अनिल दहिवले व नुतन दहिवले यांनी जिल्ह्यातील सर्व कांग्रेस समित्या मिळून महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्याचे अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश कांग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले असून मेळाव्याचे उद्घाटक सोलापूरच्या आमदार प्रणिती सुशीलकुमार शिंदे या करणार आहेत. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सिनेतारका डॉ निशिगंधा वाड करणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून आ.



अभिजीत वंजारी, आम. सहेसराम कोरेटी, जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड, प्रदेश महासचिव पी जी कटरे, अमर वराडे, डॉ. चंद्रकांत निंबार्ते, जिल्हाध्यक्ष महिला वंदना काळे, जिल्हा उपाध्यक्ष भागवत नाकाडे झामसिंग येरणे तालुकाध्यक्ष घनश्याम धामट, देवेंद्र रहांगडाले मधुसूदन दोनोडे, प्रमोद पाऊलझगडे राजू पालीवाल शिला उईके, पुष्पा खोटैले किरण हटवार भूमेश्र्वरी रहांगडाले कृष्णा शहारे चंद्रकला ठवरे उषा मेंढे चंद्रशेखर ठवरे उशा शहारे जगदीश येरोला व अशोक चांडक आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सदर महिला मेळावा हा गोदिंया जिल्ह्यातील सर्व कांग्रेस समित्या व कमिट्या यांच्या सौजन्याने होत असून आयोजक अनिल दहिवले व नुतन दहिवले यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.



# सैनिक टाकळी मध्ये शिवसेना उपतालुकाप्रमुख संभाजी गोते यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा

सैनिक टाकळी : शिरोळ येथील शिवसेना उपतालुकाप्रमुख संभाजी गोते यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कोल्हापूर जिल्हाचे उपजिल्हाप्रमुख सतीश मलमे. आरोग्य विभागाचे सचिन डोंगरे. युवा सेना तालुकाप्रमुख आकाश शिंगाडे कुरुंदवाड शहर प्रमुख सोमेश गवळी. युवा शिवसेनाप्रमुख अनिल शिरसागर.शिवसेनेचे सर्व कार्यकर्ते तसेच भाजपाचे सर्व कार्यकर्ते व सैनिक टाकळी मधील उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य गावातील सर्व लहान मोठे मित्रमंडळी तसेच संभाजी नगरमधील सर्व नागरिक या वाढदिवसाला उपस्थित होते. या कार्यक्रमा वेळी सतीश मलमे साहेबांनी आपले मनोगत व्यक्त तसेच सचिन डोंगरे व गावातील सर्व पदाधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले व संभाजी गोते यांना दीर्घायुष्य लाभो व इथून पुढील वाटचालीस भरघोस शुभेच्छा दिल्या व हा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# पाली त्रिपिटकाचा प्रकल्प बार्टीने पूर्णत्वाकडे न्यावा : आ.चाबुकस्वार

पुणे : पाली त्रिपिटकाचे मराठीत अनुवाद केल्यास त्रिपिटकातील १४० ग्रंथाचे ८४ हजार उपदेश हे मराठीत अनुवाद होणार असून दोन हजार वर्षानंतर या देशात हा प्रकल्प सुरू होणार आहे महाराष्ट्र शासनाकडून या महत्त्वकांक्षी प्रकल्पास ४ कोटी ९५ लाख इतका निधी उपलब्ध असून डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प सुरू असून बार्टीचे विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण हा प्रकल्प पुढे घेऊन जातील त्रिपिटकाचे मराठीत अनुवाद झाल्यास समाज परिवर्तनाची सुरुवात होईल हा प्रकल्प बार्टीने पुढे घेऊन जावा असे मत पालीचे अभ्यासक माजी आमदार अड गौतम चाबुकस्वार यांनी बोलताना व्यक्त केले.

माजी आमदार अड गौतम चाबुकस्वार यांनी दिनांक २ फेब्रुवारी २०२४ रोजी बार्टी संस्थेस भेट देऊन विस्तार व सेवा आयबीपीएस विभागाचे विभाग प्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांची भेट घेऊन पाली त्रिपिटकाचे मराठीत अनुवाद प्रकल्पाविषयी महत्त्वपूर्ण चर्चा केली.मान्यवरांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस व बुद्ध रूपास अभिवादन केले.



डॉ चव्हाण यांच्या हस्ते माजी आमदार चाबुकस्वार यांना द प्रॉब्लेम ऑफ रुपी हा ग्रंथ भेट देऊन सन्मानित करण्यात केले. यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ चव्हाण म्हणाले की , तत्कालीन समाज कल्याण मंत्री मा राजकुमार बडोले यांच्या कार्यकाळात आमदार अड गौतम चाबुकस्वार यांनी पुढाकार घेऊन पाली त्रिपिटकाचा अनुवाद हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प शासनाकडून मंजूर करून घेतल्याबदल त्यांचे अभिनंदन केले . हा प्रकल्प थांबलेला आहे बार्टीचे मा महासंचालक सुनील वारे सर यांना या प्रकल्पाची माहिती देऊन थांबलेला हा प्रकल्प बार्टीच्या वतीने पूर्णत्वाकडे नेण्यासाठी मी प्रयत्नशील असून प्रकाशन व प्रसिद्धी विभागाच्या वतीने याविषयी कामकाज सुरू असुन प्रतित्यसमुत्पाद म्हणजेच कार्यकारणभाव ही विश्र्वाला दिलेली तथागताची अमुल्य भेट असल्याचे डॉ चव्हाण यांनी प्रतिपादीत केले.विभागप्रमुख अनिल कारंडे यांनी आतापर्यंत ६ धम्मसंगिनी झाल्या असून म्यानमारमध्ये १९५५ साली झालेल्या धम्मसंगीनीमध्ये महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि विपश्यनाचार्य गोयंका गुरुजी उपस्थित होते असल्याचे सांगितले .याप्रसंगी प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात, डॉ प्रेम हनवते, सारिका थोरात, सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक विकास गायकवाड, नसरिन तांबोळी, डॉ संभाजी बिराजे यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन रामदास लोखंडे यांनी केले.

# अयोध्येतील रामाच्या मंदीराचे सौंदर्य डोळ्यात साठवून ठेवण्यासारखे

## हभप अभिमन्यू डोंगरे महाराज

अक्कलकोट/प्रतिनिधीः मंत्रमुग्ध करणाऱ्या वातावरणात अयोध्येतील राम मंदिराच्या गर्भगृहात रामललाची विधीपूर्वक प्राणप्रतिष्ठा स्थापित करण्यात आली.प्रभू रामाची नगरी लाखो दिव्यांनी रात्रीच्या अंधारात चांदण्याच्या प्रकाशात उजळून निघाले होते.अयोध्येतील रामलल्लाची मंदीराचे सौंदर्य डोळ्यात साठवून ठेवण्यासारखे होते.जटायुपक्षी देखील रात्रीच्या अंधाराच्या चांदण्यात उजळून निघाले होते,राम मंदिराचे आतील दृष्य,स्वर्गातील असल्याचा भास झाला.सर्व दृश्य पाहून प्रसन्न तृप्त झालो,असे हभप अभिमन्यू डोंगरे महाराज बोलताना म्हणत होते. प्रसिद्ध कीर्तनकार अभिमन्यू डोंगरे महाराज यांनी नुकतेच अयोध्या येथील रामाचे दर्शन घेऊन परतल्याने त्यांचा सत्कार बंजारा परिषदेचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष तुकाराम राठोड यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी पत्रकार विश्र्वनाथ चव्हाण यांच्या आदी उपस्थित होते



# मंत्री छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत अहमदनगर मध्ये उसळला ओबीसींचा जनसागर

## ३६० कोटी खोटे रेकॉर्ड बनविण्यासाठी दिले का ? मंत्री छगन भुजबळ यांचा हल्ला हल्लाबोल

मुंबई,नाशिक,अहमदनगर : आपल्याला आमदारकी, मंत्री पदाची कुठलीही फिकीर नसून ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी आपण शेवटपर्यंत लढणार आहोत. त्यामुळे कुठल्याही दबावाला बळी न पडता संपूर्ण ओबीसी समाजाने एकत्र येऊन लढलं पाहिजे असे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.





ओबीसी भटके विमुक्त आरक्षण बचाव एल्गार मेळावा आज अहमदनगर येथे पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री आ.महादेव जानकर,आमदार गोपीचंद पडळकर, माजी आमदार प्रकाश शेंडगे, मुस्लिम ओबीसी संघटनेचे शब्बीर अन्सारी,प्रा.लक्ष्मण हाके, सत्संग मुंडे, प्रा.पी टी चव्हाण,पांडुरंग अभंग, कल्याण दळे,शंकरराव लिंगे,दौलतराव शितोळे, डॉ.सुदर्शन घेरडे ,डॉ.स्नेहा सोनकाटे,जे.डी.तांडेल, आंधळे महाराज, मिननाथ पांडे, अरुण खरमाटे,अभय आगरकर, अनिल निकम, डॉ. नागेश गवळी, विशाल वालकर, भगवान फुलसुंदर,अंबादास गारुडकर यांच्यासह ओबीसी भटके विमुक्त समाजातील बांधव बहुसंख्येने उपस्थित होते. भाषणाच्या प्रारंभी ते म्हणाले की, गोरगरिबांना न्याय देणारे बिहारचे माजी मुख्यमंत्री, आपल्या नाभिक समाजाचे स्व. कर्पूरीजी ठाकूर यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार जाहीर केल्याबद्दल भारत सरकार आणि पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे मी मनापासून आभार मानतो. हा सर्वोच्च नागरी सन्मान त्यांना जाहीर करून देशासाठी, समाजासाठी काम करणाऱ्या ओबीसी समाजाचं ऋण त्यांनी मान्य केलं असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी मंत्री छगन भुजबळ पुढे म्हणाले की, इंग्रजांना सलग १४ वर्षे सळो की पळो करून सोडणारे आणि सर्वप्रथम क्रांतीचे स्वप्न देशाला दाखवणारे आमचा आद्य क्रांतिवीर नरवीर उमाजी नाईक वयाच्या अवघ्या ४१ व्या वर्षी देशासाठी फासावर गेले. फक्त रामोशी समाजाचेच नाही, तर ते देशाचे नाईक झाले. अशी अनेक नररत्न या समाजाने देशासाठी दिलेली आहेत. ही आमची लायकी असल्याचे सांगत लायकी काढणाऱ्यांचा समाचार घेतला. तसेच नगरला आल्यावर माझे जुने सहकारी, माजी मंत्री स्व. अनिलभैय्या राठोड यांची आठवण आल्याशिवाय रहात नाही. त्यांच्या समाजाची नगर शहरात अवघी ४०-५० घरं असतील. पण २५ ते वर्षे आमदार होते. लढायला लागतं, रडून काही होत नाही असे त्यांनी आवर्जून सांगितले.

ते म्हणाले की, खोटे पुरावे सादर करून कुणबी प्रमाण पत्र मिळवले जात आहे. असे खोटे प्रमाणपत्र जर दिले गेले तर आरक्षण ओबीसींचे सर्व आरक्षण संपुष्टात येईल हे सर्वांच्या लक्षात येत नाही का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. इंदिरा सहानी केसचा दाखला देत मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, आजवर सुप्रीम कोर्टाचे अनेक निकाल आहेत ते मराठा आरक्षणाच्या विरोधात आहेत. झुंडशाहीने कोणी आरक्षण घेतले तर त्याला बाहेर काढले जाईल असे निवाडे असल्याचे अनेक दाखले त्यांनी दिले.

ते म्हणाले की, मराठा समाजाबाबत मसुदा निघाल्यापासून महाराष्ट्रामध्ये उन्माद केला जातोय ओबीसी लोकांना त्रास दिला जातोय. त्यांच्या घरासमोर येऊन शिवीगाळ केली जातेय. ओबीसी मोर्चात सामील होतात म्हणून मारहाण केली जात आहे त्रास दिला जात आहे. हे नेमक कशासाठी केल जातंय असा सवाल त्यांनी उपस्थितीत केला. तसेच ते म्हणता आहे की आम्हाला आरक्षण मिळालं म्हणून गुलाल उधळत आहोत. जर तुम्हाला आरक्षण मिळालं गुलाल उधळला मग आता पुन्हा उपोषण का करताय असा टोला त्यांनी मनोज जरांगे यांना नाव न घेतला लगावला. तसेच ते तर आता अर्थसंकल्पातून आरक्षण मागत असल्याचा चिमटा देखील त्यांनी काढला.

ते म्हणाले की, आज आपले प्रश्न सोडविण्यासाठी ओबीसी समाजाने कुठल्याही दबावाला बळी न राहता एकत्र येऊन लढलं पाहिजे. आज ही वेळ ओबीसींवर आली आहे. उद्या ती दलित, आदिवासीवर देखील येईल त्यामुळे या लढ्यात ओबीसी बांधवांसोबत दलित आदिवासी बांधवानी देखील साथ महत्वाची असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. तसेच बिहार आणि आंध्र प्रदेश प्रमाणे महाराष्ट्र सरकारने देखील जातनिहाय जनगणना करावी अशी मागणी त्यांनी केली.

ते म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी आमचा विरोध नाही. त्यांना वेगळ आरक्षण द्या अशी आमची मागणी आहे. आता ओबीसी समाजासाठी ज्या योजना आहेत. त्या मराठा समाजाला लागू करण्यात येत आहे. या योजना केवळ मराठा समाजाला नाही तर इतर समाजालाही द्या असे सांगितले. ओबीसी समाजासाठी योजना आखताना निधी किती लागेल याचा विचार करून मग त्या मंजूर केल्या जात आहे. मात्र मराठा समाजाला देतांना तसा कुठलाही विचार होत नाही. नुसती मागणी झाली की लगेच निर्णय होतो असे का ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

मुख्यमंत्र्यांना सवाल उपस्थित करत ते म्हणाले की, मुख्यमंत्र्यांचा अवमान करायचा नाही. मात्र प्रश्न करायचा आहे वाशीमध्ये तुम्ही जाहीर केलं मी मराठा समाजाला आरक्षण देण्याची शपथ घेतली होती ती मी पूर्ण केली. मग मला प्रश्न पडतोय की शपथ पूर्ण झाली तर आयोगाचा सर्वे कशाला? तपासणी करणारे लोक आपोआप माहिती भरतात. खोटं खोटं सुरू आहे. आरक्षण मिळाले तर हे कशासाठी? अनेक ठिकाणी खोटे कुणबी प्रमाणपत्र दिली जातात. तीनशे साठ कोटी रुपये खर्च यासाठी करत आहात का ? असे अनेक सवाल उपस्थित करत मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणावरुन प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

ते म्हणाले की, आपल्यावर अनेक प्रघात होत असतांना आपण अडीच महिने शांत बसलो काहीही बोललो नाही. आम्ही शांत आहोत म्हणजे त्याचा अर्थ आम्ही घाबरलो असा होत नाही असे सांगत दिलबर के लिए दिलदार है हम, दुश्मन के लिए तलवार है हम या पंक्तीतून त्यांनी विरोधकांना इशारा दिला. जे आज माझा राजीनामा मागत आहे. त्यांना मला सांगयचे आहे की, १७ नोव्हेंबरला अंबड येथे पहिली जाहीर सभा झाली. सभेला जाण्यापूर्वीच आपण १६नोव्हेंबरला राजीनामा दिला असल्याचे त्यांनी स्पष्ट करत ओबींसीसाठी शेवट पर्यंत लढणार असून 'जीवन है संग्राम बंदे,ले हिंमत से काम' असा एकच निर्धार आपण केला असल्याचे त्यांनी सांगितले.

## डुबेरे येथील जनता विद्यालयातील विद्यार्थ्यांना बँकिंग प्रणाली आर्थिक व्यवहाराची गुरुकिल्ली या विषयावर मार्गदर्शन





सिन्नरः डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यार्थी दशेतच आर्थिक व्यवहार करावयाचे ज्ञान मिळावे यासाठी श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेच्या वतीने बँकिंग प्रणाली-आर्थिक व्यवहाराची गुरुकिल्ली या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.दप्तर मुक्त शाळा या उपक्रमांतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत.

अध्यक्षस्थानी श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे संचालक तथा एन.के.फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश वाजे होते. व्यासपीठावर पतसंस्थेचे संचालक तथा सिन्नर तालुका बार असोसिएशनचे सदस्य ॲड. प्रदीप वारुंगसे,पतसंस्थेचे कार्यकारी अधिकारी महेश कुटे ,विद्यालयाचे पर्यवेक्षक रामदास वाजे,दिंगबर जाधव, सोमनाथ पगार आदी उपस्थित होते. पर्यवेक्षक रामदास वाजे यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्वागत केले. श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नारायणशेठ वाजे व विद्यालयाचे प्राचार्य किशोर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी गणेश वाजे,ॲड प्रदीप वारुंगसे यांनी विद्यार्थ्यांना बँकिंग प्रणाली, प्रणालीचे उपयोग ,दैनंदिन जीवनात आर्थिक व्यवहाराचे महत्त्व , सेविंग खाते, मासिक आरडी खाते ,ठेव खाते आदी खात्याचे प्रकार व त्यावर मिळणारे व्याज याविषयी सविस्तर माहिती दिली. पैशाचे योग्य नियोजन जर असेल तरच आपण प्रगती करू शकतो .बँकिंग प्रणाली आपल्या जीवनात महत्त्वाची आहे . ती आपल्या कळण्यासाठी गावातील पतसंस्थेत आपले सेविंग खाते (बचत खाते )सुरू करावे असे आव्हान त्यांनी केले.यामुळे बँकिंग व्यवहाराचे ज्ञान प्राप्त होईल आणि या ज्ञानामुळे भविष्यात तुमची प्रगती होईल.म्हणूनच आपल्या भविष्याचा दृष्टीने आपली प्रगती व्हावी या उदात्त हेतूने श्रीमंत परिवारातर्फे आजचे हे चर्चासत्र आयोजित केलेले होते . सूत्रसंचालन शालेय सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी.आर. करपे यांनी तर आभार सोमनाथ गिरी यांनी मानले.

## विद्यार्थ्यांनी कृतीतून नवीन समाज घडविण्यासाठी सज्ज असले पाहिजे : भुजंग बोबडे

पंढरपूर/प्रतिनिधी : एकविसावे शतक हे आव्हानाचे शतक असून ते विद्यार्थ्यांनी स्वीकारले पाहिजे. विद्यार्थ्यांना चांगले लिहिता, बोलता, वाचता आले पाहिजे. त्याचबरोबर विचार करता आला पाहिजे. उपलब्ध ज्ञानाचा जीवनात उपयोग करून आपले जीवन सुखकर करता आले पाहिजे. मोठेपणा हा कृतीतून व्यक्त होत असतो. म्हणून विद्यार्थ्यांनी कृतीतून नवीन समाज घडविण्यासाठी सज्ज असले पाहिजे. समाजाप्रति असलेली भावना व नाते दृढ असले पाहिजे. एका रात्रीतून आयुष्य घडत नाही. त्यासाठी सातत्यपूर्ण परिश्रमाची आवश्यकता असते. असे प्रतिपादन जळगाव येथील हेरीटेज फौंडेशनचे संचालक भुजंग बोबडे यांनी केले.



रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात रुसा काम्पोनंट आठ अंतर्गत इतिहास विभागाच्या वतीने सामंजस्य करारांतर्गत आयोजित 'एकविसाव्या शतकातील युवकांपुढील आव्हाने' या विषयावर ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे हे होते. भुजंग बोबडे पुढे म्हणाले की, शिक्षणातून माणूस घडला पाहिजे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी मूल्य शिक्षण, नीती शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षणातून ज्ञानासोबत संस्कारही घेतले पाहिजेत. सध्या विद्यार्थी मोबाईलवर सर्वात जास्त वेळ खर्च करत आहेत. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर केवळ करिअरच्या संबंधीच केला पाहिजे. सध्या समाजातील माणुसकी लोप पावत आहे. त्यामुळे मानवी संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी आपण सामूहिक प्रयत्न केले पाहिजेत.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षण आणि कौशल्याधारित शिक्षण देण्याची तरतूद सरकारने स्वीकारली आहे. मात्र या बदलाचा विद्यार्थ्यांनी व्यक्तीमत्त्व घडविण्यासाठी लाभ घेतला पाहिजे. स्वत:चा आत्मिक विकास ही सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली आहे. याचे गमक विद्यार्थ्यांनी जाणले पाहिजे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय इतिहास विभाग प्रमुख प्रोफे. डॉ. हनुमंत लोंढे यांनी करून दिला. या कार्यक्रमात हेरीटेज फौंडेशन जळगाव व कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. या कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, पर्यवेक्षक प्रा. युवराज आवताडे, प्रा. डॉ. समाधान माने, प्रा. डॉ. रमेश शिंदे, प्रा. डॉ. दत्तात्रय चौधरी, प्रा. राहुल मुसळे, प्रा. डॉ. रविराज कांबळे, प्रा. सुमन केंद्रे, प्रा. बाळासाहेब गायकवाड व विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. उमेश साळुंखे यांनी केले. शेवटी उपस्थितांचे आभार प्रा. कल्याण वाटाणे यांनी मानले.

## डॉ.योगेशजी जाधव यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात संपन्न

पत्रकार नामदेव निर्मळे

योगेश दादा यांनी कलागुणांना वाव दिल्यामुळे कुमारी शौर्या निर्मळे व कुमारी स्वरा निर्मळे यांना जिल्हा परिषद पुरस्कार प्राप्त झाला . व नाकाला जीभ लावणे या कलेतून त्यांनी इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड पर्यंत मजल मारली. असे असंख्य नागरिकांना पाठबळ दिले. यांच्या सहकार्यामुळे टाकळीवाडी सारख्या खेडेगावातील लहान मुली बनल्या रेकॉर्ड होल्डर व त्यांची कला जगासमोर आली . नेहमी हाकेला धावून येणारे निर्मळ मनाचे




दैनिक पुढारीचे कार्यकारी संपादक मा.योगेश जाधव दादा यांचा वाढदिवस आज मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कोल्हापुरातून कोल्हापूर थाळीतून अनेकांना आज अन्नदान करण्यात आले. गोरगरिबांच्या हाकेला धावून येणारे असे व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. आतापर्यंत त्यांनी अनेक कलागुणांना वाव देण्यात आलेला आहे. वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना भारत सरकारच्या रसायन व खत मंत्रालय महामंडळाचे संचालक भारतीय जनता पार्टी पंचायतराज व ग्रामविकास विभागाचे पश्र्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष डॉ. संजय दादा पाटील, दैनिक पुढारीचे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव साहेब ही उपस्थित होते. सोबत महाराष्ट्र क्रांती सेना अध्यक्ष व मेट्रो हायटेकचे अध्यक्ष मा.सुरेश दादा पाटील, मेट्रो हायटेक उपाध्यक्ष मा.भरत पाटील, भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ॲड.सुशांत संजय पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.


## हत्तीकणबस केंद्राची शिक्षण परिषद उत्साहात संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील हत्तीकणबस जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेची माहे- जानेवारीच्या शिक्षण परिषद संपन्न हत्तीकणबस येथे शनिवार ०३ फेब्रुवारी रोजी शैक्षणिक वातावरणात अतिशय उत्साहात पार पडली.प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजन तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांनी केली आहे.



तालुका विस्तार अधिकारी दयानंद कवडे , हत्तीकणबस केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश शटगार ,भुरीकवठे केंद्राचे केंद्रप्रमुख बा.ना. चव्हाण , विषयतज्ञ गणेश अंबुरे व केंद्रीय मुख्याध्यापक मुर्डी उपस्थित होते.तसेच हत्तीकणबसच्या शा.व्य. स.चे अध्यक्ष देवेंद्र बिराजदार,उपाध्यक्ष श्री पंचाप्पा घोडके,सरपंच श्रीशैल माळी,उपसरपंच श्री म्हेत्रे काका,तंटामुक्त अध्यक्ष प्रकाश बिराजदार यांनीही उपस्थित लावली.यावेळी केंद्रातील सर्व १२ जि.प.शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक आणि तीन खाजगी माध्यमिक शाळेचे शिक्षकही उपस्थित होते.

सर्वप्रथम शाळेच्या नूतन शौचालयच्या युनिटचे फीत कापून उदघाटन करण्यात आले.त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी केंद्रशाळा हत्तीकणबसच्या विद्यार्थिनीनी अतिशय सुंदर आवाजात इशस्तवन व स्वागतगीत गायले.त्यानंतर शाळेच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.यावेळी गटशिक्षणाधिकारी श्री आरबाळे यांनी शिक्षकांना शैक्षणिक वाटचालीत अधिकारी व पदाधिकारी यांच्या सहकार्याने विद्यार्थी व शाळा विकास साधावा असे सुचवताना पंचसूत्रीचे पालन करण्याचा सल्ला दिला. केंद्रप्रमुख श्री शटगार यांनी 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या उपक्रमाबद्दल मार्गदर्शन केले.बा.ना.चव्हाण यांनी सोलापूर जिल्हा शैक्षणिक स्वास्थ्यपत्रिका याबद्दलची माहिती सांगितली. विस्ताराधिकारी कवडे यांनी शिक्षकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण हेच ध्येय ठेवा असा संदेश दिला.शेवटी मुख्याध्यापक श्री मुर्डी सरांनी सर्वांचे आभार मानले व स्नेहभोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.सूत्रसंचालन डावरे सर यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केंद्रशाळा हत्तीकणबसचे मुख्याध्यापक मुर्डी सर,सौ कोरेकर मॅडम,गायकवाड मॅडम,श्री मंगरूळे सर,श्री सुरवसे सर,श्री डावरे सर,श्री पांचाळ सर व श्री जाधव सर यांनी परिश्रम घेतले.



## कुमार व कन्या विद्या मंदिर सैनिक टाकळी येथे सकाळ समूहाची सदिच्छा भेट

सैनिक टाकळी : सैनिक टाकळी कुमार व कन्या मंदिर शाळेस सकाळ रिलीफ फंडातून प्रत्येकी पाच लाख रुपये रक्कम प्राप्त झाले आहे. मिळालेल्या रकमेचा विनियोग कशा पद्धतीने झाला आहे. याची पाहणी करण्या कामी माननीय श्री राहुल गरड साहेब. तसेच माननीय श्री भवानी सिंग घोरपडे.सरकार बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळ रीलीप टीमने शाळेस भेट दिली. टीम मध्ये सकाळ समूहाचे आकाश मोहिते सर. श्री आण्णासो गवळे सर. श्री जितेंद्र मणुजे सर यांची उपस्थिती होती. टीमने शालेय साठी खर्च केलेल्या बाबींचे व परिसराचे चित्रीकरण करून घेतले त्याबद्दल त्यांच्याकडून कौतुक करण्यात आले. याप्रसंगी दोन्ही शाळेचे व्यवस्थापन समिती माननीय श्री रावसाहेब पाटील व सुनील पाटील ग्रामपंचायत प्रशासनाचे माननीय माजी उपसरपंच सुदर्शन भोसले. संतोष गायकवाड. तज्ञ संचालक माननीय श्री सुधाकर गायकवाड. व श्री अनिल पाटील समिती सदस्य तुकाराम पवार. व दोन्ही शाळेचे मुख्याध्यापक उपस्थित होते.